# नर्सिंग सीईटीला कॉलेज मॅनेजमेंट असोसिएशनचा विरोध

## राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा

**औरंगाबाद / तुषार वखरे**

येत्या शैक्षणिक वर्षापासून नर्सिंग अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्थात आरोग्य सेविका बनण्यास इच्छुक उमेदवारांना राज्य सामाजिक परीक्षेनंतर (सीईटी) प्रवेश मिळणार आहे. या निर्णयास संघटनांनी विरोध दर्शविण्यास सुरुवात केली असून हा निर्णय मागे न घेतला गेल्यास राज्यभर आंदोलन छेडण्याचा हालचाली सुरू केल्या आहेत.

वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेशासाठी होणाऱ्या प्रवेश परीक्षांपाठोपाठ नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीही यापुढे सीईटी द्यावी लागणार आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करणाऱ्या आरोग्य सेविकांना आता एनएनएम या नर्सिंगच्या प्रवेशासाठी ही परीक्षा बंधनकारक असणार आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या (सीईटी) सेलने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता सीईटी परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आधारे नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेश मिळणार आहे. बारावी परीक्षेच्या निकालानंतर ही सीईटी देणे बंधनकारक असेल.

मात्र या निर्णयास खासगी नर्सिंग स्कूल अॅण्ड कॉलेज मॅनेजमेंट असोसिएशने विरोध दर्शविला आहे. हा निर्णय ग्रामीण भागातील विद्यार्थिनींसाठी गैरसोयीचा आहे. दरवर्षी आहे त्या जागाच भरल्या जात नाहीत मग सीईटी घेऊन काय साध्य होईल, असे म्हणत संघटनेने विरोध दर्शविला आहे.



### राज्यात १८ हजार जागा

एनएनएमचा अभ्यासक्रम ४९३ महाविद्यालयांत शिकवण्यात येतो. या अभ्यासक्रमाच्या राज्यात सुमारे १८ हजार जागा आहेत. कोणत्याही शाखेतून बारावी पास झाल्यानंतर या अभ्यासक्रमात प्रवेश घेता येतो. एनएनएम हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्यसेविका म्हणून नोकरीची संधी उपलब्ध असते. २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर झालेल्या बी.एस्सी. नर्सिंगच्या ९१४ जागा राज्यात रिक्त होत्या. विधानसभा निवडणुका आणि अतिवृष्टी, पूरस्थितीमुळे एएनएम, जीएनएम, बी एस्सी, पीबीबी एस्सी, एम एस्सी, नर्सिंगच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागले. परिणामी ३१ डिसेंबरपर्यंत प्रवेशप्रक्रिया सुरू होती. सीईटी लागू केल्यास शैक्षणिक सत्राचे वेळापत्रक बिघडेल. विधी, अभियांत्रिकी, मेडिकल, डी एड्, बी एड्प्रमाणे या अभ्यासक्रमास सीईटीमुळे विद्यार्थी मिळणार नाही, अशी भीती संघटनेला आहे.

### सीईटीचा अट्टहास नकोच

तंत्रशिक्षण प्रवेश, डी फार्मसी अभ्यासक्रमासाठी सीईटी लागू नाही. एनएनएम हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहे. तरीही सीईटी लावण्याचा घाट घालण्यात येत आहे. यावर्षी ३५ टक्के जागा रिक्त असून सीईटीमुळे हा आकडा वाढू शकतो. सीईटीची सक्ती कोणाचे 'लाड' पुरविण्यासाठी करण्यात आलीय हे न समजलेले कोडे आहे. रुग्णांना आपल्या सेवेद्वारे मायेची 'छाया' देणाऱ्या विद्यार्थ्यांना सीईटीचा अट्टहास नकोच.

-शंकर आडसूळ (राज्य समन्वयक, खासगी नर्सिंग स्कूल अॅण्ड कॉलेज मॅनेजमेंट असोसिएशन)

